# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 09/08/2021 (सोमवार)

(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 3 कि. मी. मौजा भिवापुर वाडा धाबा तास येथे दिनांक 07/08/2021 चे 19:00 वा. दरम्यान जगन दाजीगा मेश्राम ( मृतक ), वय 60 वर्ष, रा. घाटउमरी हे आपल्या घराकडून तास गावाकडे पायदळ राज्य महामार्ग क्र. 9 भिवापूर ते उमरेड या रोडनी जात असता भिवापूर कडून उमरेड कडे जाणा–या एका अज्ञात चार चाकी वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून रोडनी पायदळ जाणा–या जगन मेश्राम यांना मागवून जोरदार धडक दिल्याने त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा यादव पोस्टे भिवापूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि भस्मे मो.न. 9764946808 हे करीत आहे.

### अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कुही :– अंतर्गत मौजा कुही येथे दिनांक 08/08/2021 चे 01.00 वा. ते 02.30 वा. दरम्यान फिर्यादी पोशि गिरघारी राठोड हे रात्रगस्त करीत असतांना त्यांना आरोपी क्र. 1) शिव उर्फ सोनु सुभाष कटारे, वय 21 वर्ष, रा, प्लॉट नं 328 जागनाथ बुवारी, भारतमाता चौक, महालक्ष्मी मेटर समोर नागपुर, 2) हर्षल सुनिल सोरदे, वय 25 वर्ष रा. केअर ऑफ धरम गेडाम, आय बी एम रोड भिमटेकडी, गोडे वकीलच्या घराजवळ, गिटटीखदान नागपुर, 3) निक्की उर्फ मोनु राजुभाउ दुर्गे वय 28 वर्ष रा. वि दा सावरकर चौक, वार्ड नं, 7 वरूड ता, वरूड जि, अमरावती हे संशयास्पद स्थितीत आढळुन आले. आरोपीतांच्या ताब्यात टोकदार लोखंडी गुप्ती स्वतः जवळ कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या शस्त्र अवैधरित्या मिळुन आला. आरोपीतांच्या ताब्यातुन शस्त्र व वाहन आणि मोबाईल असा मुददेमाल एकुण कि. 1,10,500/–रू. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलिस शिपाई गिरघारी राठोड, पोस्टे. कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि शुंभागी तकीत या करीत आहेत.

### गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 35 कि.मी अंतरावरील मौजा आमगाव रिठी शिवार येथे दिनांक 07/08/2021 चे 21.00 वा. दरम्यान राजेन्द्र उमराव गोणे(मृतक) वय 36 वर्ष रा तिनखेडा याने अज्ञात कारणातुन तुषार राठोड यांचे शेतातील आउट हाउस हॉल चे दार आतमधुन लावुन हॉलच्या सिंलिग फॅनला नायलॉन दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गणेश उपासराव देहारे, वय 55 वर्ष, रा. गौराळा ता.हिंगणा जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केंढाळी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक राजेश हावरे 9923365622 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर